लोकमत

PLI

# भारतीय डाक विभाग
## वरिष्ट अधीक्षक, डाक घर सोलापूर विभाग, सोलापूर यांचे कार्यालय 413001.

India Post

# विमा प्रतिनिधी नेमणे आहे

१) टपाल जीवन विमा योजना व ग्रामीण टपाल जीवन विमा योजनाअंतर्गत असणाऱ्या विविध विमा पॉलिसींच्या विक्रीसाठी विमा प्रतिनिधींची नेमणूक वरिष्ट अधीक्षक, सोलापूर विभाग, सोलापूर 413001 यांच्या मार्फत थेट मुलाखतीद्वारे केली जाणार आहे.

२) इच्छुक उमेदवारांनी वरिष्ट अधीक्षक, सोलापूर विभाग, सोलापूर 413001 यांच्या नावाने एक लेखी अर्ज, संपर्कासाठी स्वतःचे मोबाइल क्रमांकसह व शैक्षणिक पात्रतेची आवश्यक प्रमाणपत्रे (फक्त झेरॉक्स प्रत) जसे की आधार कार्ड, पॅन कार्ड, बारावी बोर्ड सर्टिफिकेट, डिग्री / डिप्लोमा सर्टिफिकेट आणि 3 फोटो व अन्य संबंधित कागदपत्रे स्पीड पोस्टद्वारे पाठवून द्यावे. आपला अर्ज आणि शैक्षणिक कागदपत्र जास्तीत जास्त दिनांक 21.05.2026 रोजी पर्यंत वरिष्ट अधीक्षक, सोलापूर विभाग, सोलापूर - 413001 यांच्या कार्यालयात फक्त स्पीड पोस्ट मार्फत पाठवू शकता.

**पात्रतेच्या अटी :**

३) **वय मर्यादा :** उमेदवाराचे वय मुलाखतीचे दिवशी किमान 18 वर्ष असावे. कमाल वय मर्यादा नाही.

४) **शैक्षणिक पात्रता :** अर्जदाराने केंद्र किंवा राज्यसरकार द्वारे मान्यताप्राप्त बोर्डाद्वारे 10 किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.

५) **अनुभव :** इच्छुक उमेदवारांस विमा पॉलिसी विक्रीचा अनुभव (Marketing Skill), संगणकाचे ज्ञान, स्थानिक भागाची पूर्णतः माहिती असणे अपेक्षित आहे.

६) बेरोजगार, स्वयंरोजगार असणारे युवक/युवती, सेवानिवृत्त शिक्षक, कोणत्याही विमा कंपनीचे माजी विमा प्रतिनिधि / सल्लागार, अंगणवाडी कर्मचारी, महिला मंडळ कर्मचारी, स्वयंसहाय्यता गट, माजी सैनिक, ग्राम प्रधान, ग्रामपंचायत सदस्य किंवा डाक विभाग प्रमुख यांस विमा प्रतिनिधि म्हणून योग्य वाटणारी व्यक्ती.

७) मुलाखतीद्वारे विमा प्रतिनिधि म्हणून निवड झालेल्या उमेदवारांना त्यांनी घेतलेल्या विमा हप्त्याच्या रकमेवर टपाल विभागाने वेळोवेळी ठरवून दिल्याप्रमाणे कमिशन / incentive दिले जाईल.

८) थेट मुलाखतीद्वारे टपाल जीवन विमा व ग्रामीण टपाल जीवन विमा प्रतिनिधि म्हणून निवड झालेल्या उमेदवारांना टपाल खात्यामार्फत आंतरिक प्रशिक्षण दिले जाईल.

९) निवड झालेल्या उमेदवारांना IRDA ची online परीक्षा पास करावी लागेल.

१०) निवड झालेल्या उमेदवारांना ₹500/- टपाल बचत खात्यामध्ये / आणि ₹ 5,000/- राष्ट्रीय बचत पत्र मध्ये भारताचे राष्ट्रपतीच्या नावाने तारण म्हणून ठेवावे लागतील.

११) उमेदवारांच्या थेट मुलाखतीचे वेळापत्रकः शॉर्टलिस्ट झालेल्या उमेदवारांना थेट मुलाखतीच्या तारीख, वेळ आणि ठिकाण त्यांनी स्पीड पोस्टद्वारे त्यांच्या अर्जात पाठवलेल्या मोबाईल क्रमांकावर कळवले जातील.

**वरिष्ट अधीक्षक**
**डाक घर सोलापूर विभाग**

Solapur Main
Page No. 4 May 05, 2026
Powered by: erelego.com